# कार्यालय, नागपूर महानगरपालिका
## धरमपेठ झोन क्रं. 2
हरणेमहिला समाज भवनाच्या मागे, गोकुळपेठ, नागपूर - 440010
दुरध्वनी क्रं. 07122565589, 07122567056
ई मेल आय डी –dharampethzone@gmail.com


जा. क्रमांक : 282/ध.झो./स.आ./2025-26 दिनांक 24/10/2025

**अर्जदार :- श्री. विवेक मिश्रा, रा.मौजा गाडगा, धरमपेठ, नागपूर.**
**गैरअर्जदार :- श्री. यश दुबे,(वहीवाटदार) रा. मौजा गाडगा, धरमपेठ,नागपूर**

सदहु प्रकरणाबाबत अर्जदार यांनी दि. 31/01/2025 रोजी झोन कार्यालयात गैरअर्जदाराबाबत अनधिकृत बांधकाम करीत असल्याबाबत अर्ज सादर केला. नागपूर महानगरपालिका, नागपूर. नगर रचना विभाग सुधारीत परिपत्रक क्र. नगर रचना/अनधिकृत बांधकाम/1373/2025 दि. 22/09/2025 अन्वये गैरअर्जदार व अर्जदार यांना 13/08/2025 रोजी पत्राव्दारे कळवून दि. 21/08/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता दोघांची सुनावणी सहा. आयुक्त यांच्या कक्षात ठेवलेली होती. त्याप्रमाणे अर्जदार श्री. विवेक मिश्रा गैरअर्जदार श्री. यश दुबे, (वहीवाटदार) दि. 21/08/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता अनुपस्थित होते. त्यानंतर अर्जदार व गैरअर्जदार यांना दि. 28/08/2025 रोजी दि. 21/08/2025 पत्रान्वये बोलविण्यात आले होते. त्याप्रमाणे अर्जदार श्री. विवेक मिश्रा हे दि. 28/08/2025 रोजी हजर झाले. तसेच गैरअर्जदार श्री. यश दुबे हे उपस्थित झाले नाही. त्यामुळे गैरअर्जदार श्री. यश दुबे यांना दि. 03/09/2025 रोजी उपस्थित राहण्याकरीता अंतिम नोटिस देण्यात आली होती तरीसुध्दा गैरअर्जदार श्री. यश दुबे गैरहजर होते. त्यामुळे अर्जदार श्री. विवेक मिश्रा यांचे म्हणने नोंदवून घेतले. अर्जदार श्री. विवेक मिश्रा यांचे म्हणन्यानुसार म.न.पा. नगर रचना विभाग यांचे परिपत्रक दि. 07/05/2025 मधील सुचना अ मुद्दा क्र. 01, 15 दिवसाची कारणे दाखवा नोटिस श्री. यश दुबे व श्रीमती संगिता दुबे यांना तमिल करण्याचे निर्देश देण्यात यावे. त्यावेळी त्यांनी मंजूर नकाशा प्रत तसेच ॲग्रीमेंट इत्यादी कागदपत्र सादर केले.

अर्जदार श्री. विवेक मिश्रा यांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 53(1) अंतर्गत नोटिस दि. 25/02/2025 रोजी देण्यात आल्याचे दिसते.

गैरअर्जदार श्री. यश दुबे(वहीवाटदार), यांनी प्लॉट क्र. 254, न.भु. क्र. 1079, मौजा गाडगा, धरमपेठ, माता मंदिर रोड, नागपूर येथिल मालमत्तेचा एकुण अनधिकृत बांधकाम 94.47 चौ.मी असल्याचे कलम 53 अंतर्गत नाटिस मध्ये नमुद आहे.

आदेश :-

अर्जदार श्री. विवेक मिश्रा, रा. मौजा गाडगा, धरमपेठ, नागपूर (गैरअर्जदार श्री यश दुबे (वहीवाटदार) रा. मौजा गाडगा, धरमपेठ, नागपूर) अनधिकृत बांधकामाबाबत आपल्या मालमत्तेचे अनधिकृत बांधकामाविरूध्द महाराष्ट्र प्रादेशीत व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 53 अंतर्गत नोटिस आपणांस देण्यात आलेले होते. त्याप्रमाणे आपण अनधिकृत बांधकाम काढलेले नाही. त्यामुळे आदेश मिळल्यानंतर 15 दिवसाच्या आत स्वत: अनधिकृत बांधकाम काढून टाकावे. आपण आदेशाचे पालन केले नाही उक्त अधिनियमास नमुद कायदेशीर कार्यवाहीस आपण पात्र राहाल, तसेच विहीत कालावधीनंतर तुमच्या जबाबदारीने व स्वत:च्या खर्चाने अनाधिकृत बांधकाम वेळेत काढून घेण्यात यावे. अन्यथा वरील आदेशाची अंमलबजावणी केली नाही तर महानगरपालिकेव्दारे अनाधिकृत बांधकाम काढण्याची कारवाई करण्यात यईल व त्या कारवाई करिता लागणारा संपूर्ण खर्च आपलेकडून वसूल करण्यात यईल याची नोंद घ्यावी.

सहाय्यक आयुक्त
धरमपेठ झोन क्र. ०२
म.न.पा. नागपूर

प्रतिलीपी :-

1. मा. आयुक्त तथा प्रशासक, नागपूर महानगरपालिका, नागपूर, सिव्हील लाईन्स, नागपूर.
2. मा. जिल्हाधीकारी, जिल्हाधीकारी कार्यालय, सिव्हील लाईन्स, नागपूर.

प्रत,:

3. श्री. विवेक मिश्रा, रा.मौजा गाडगा, धरमपेठ, नागपूर.
4. श्री. यश दुबे,(वहीवाटदार) रा. मौजा गाडगा, धरमपेठ,नागपूर